लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विकणे आहे
मौजे नान्नज व अकोलेकाटी ता उत्तर सोलापूर येथील बागायत शेतजमीन सर्व सोयीनियुक्त विकणे आहे शेतामध्ये ५ बोअरवेल, शेततळे, मोटारपंप, सालगडी राहणेसाठी वस्ती, आमराई, ७० फूट खोल विहीर, ड्रीप पाईप लाईन, स्प्रिंकलर, द्राक्ष फाउंडेशनसह विकणे आहे
संपर्क: मनोरमा मल्टीस्टेट नान्नज शाखा
श्री पवार- 8600568860, 9763663792, 9545386261

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २० वा | शनिवार, दि. ०३ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▶ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▶फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▶प्रिंसेस ब्लाऊज ▶अरी वर्क ▶पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# रयत शिक्षण संस्था वैचारिक दिवाळखोरीत निघाली आहे काय?

दत्तकुमार खंडागळे
मो.9561551006

सातारा जिल्ह्यातील पाचवड या गावात रयत शिक्षण संस्थेचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय आहे. गतवर्षी या विद्यालयाच्या प्राध्यापिका मृणालिनी आहेर यांनी ऑगस्ट क्रांती दिनाच्या कार्यक्रमात बोलत असताना दिलेल्या संदर्भावरून वादंग माजले. त्यासाठी त्यांना जीवघेणा संघर्ष करावा लागला. तब्बल एक वर्ष आहेर मॅडम आणि त्यांच्या कुटूंबाने मस्तावलेल्या धर्मांध झुंडीशी एकाकी संघर्ष केला. ऑगस्ट क्रांती दिनाच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी कॉम्रेड गोविद पानसरे यांच्या " "शिवाजी कोण होता ?" या पुस्तकाचा संदर्भ दिला होता. यावर तिथल्या बजरंग दल, शिवप्रतिष्ठान, अभाविपने त्यांच्यावर प्रचड दडपण आणले, त्यांचे मॉबलिंचींग करण्याचा प्रयत्न केला. त्यांना दम दिला, धमक्या दिल्या. मोठ्या प्रमाणात मानसिक छळ केला. स्थानिक पोलिसांनीही त्यांच्या अकलेला जातीयवादाचे गळू झाल्याचे दाखवून दिले. ते ही या प्रकरणात मुखार्सारखे वागले. ज्या वदीर्ने रक्षण करावयाचे असते, कायद्याची भाषा बोलायची असते तेच वर्दीवाले या प्रकरणात कायद्याला आणि वदीर्ला कलंक ठरतील असे वागले. भुईंज पोलिस ठाण्याचे कुणी गर्जे नावाचे दिडशहाणे सहाय्यक पोलिस निरिक्षक बजरंग दलाच्या कार्यकत्यार्सारखे वागले. त्यांनीही आहेर यांच्यावर दबाव टाकत माफी मागा नाहीतर एफ आय आर दाखल करू अशा धमक्या दिल्या. मृणालिनी आहेर यांचे सेवा निवृत्त प्राध्यापक असलेल्या पतींना गर्जे वर्दीच्या माजात सर्वासमोर अपमानास्पद बोलला. मृणालिनी आहेर नावाच्या वाघिणीने या कुठल्याच भामट्यांना भिक घातली नाही. वर्दीतला गर्जे नावाचा भामटाही त्यांनी कोलून लावला. दुस-या दिवशी महाविद्यालयात शंभर दिडशे लोकांचा जमाव आला. आहेर यांना दमदाटी करू लागला. "जय श्री राम" म्हणण्याची जबरदस्ती करू लागला. त्यांनी माफी मागावी यासाठी दडपण टाकू लागला. विशेष म्हणजे त्या कॉलेजच्या प्राचार्या बोबडे मॅडम यांच्या विवेकाचीही बोबडी वळली होती. त्या ही आहेर यांच्यावर माफी मागण्यासाठी दबाव आणत होत्या. पण मृणालिनी आहेर त्यांच्या विचाराशी ठाम राहिल्या. त्यांनी या धर्मांध झुंडीला लायकीत ठेवले. आहेर यांची गाडी फोडून बॉलने फुटल्याचा बनाव केला. आहेर मॅडमनी माफी न मागितल्याचा राग मनात धरून सहाय्यक पोलिस निरिक्षक असलेल्या गर्जेने आहेर यांच्यावर कारवाई करण्याचे पत्र रयत शिक्षण संस्थेला दिले होते. त्या पत्राची दखल घेत संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी ते संस्थेकडे पाठवत त्यांच्यावर कारवाई करण्यास अनुमोदन दिले. संस्थेने बी टी जाधव नावाच्या दुस-या दिड शहाण्याला समितीवर नेमले. चौकशी एका महिलेची करावयाची होती. संस्थेने यासाठी एक सदस्यीय समिती नेमली पण त्यात कुणी महिला नव्हती. या समितीचा अध्यक्ष असलेल्या पठ्याने उपस्थित नसलेल्या लोकांची साक्ष घेत अहवाल सादर केला. अखेर संस्थेने आहेर यांच्यावर बदलीची कारवाई केली. एकूणच या प्रकरणात आहेर मॅडम यांना खुप संघर्ष करावा लागला. बंजरंग दल, शिवप्रतिष्ठान आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नावाच्या जातीयवादी टोळक्यांशी भिडावं लागल. जीवावर उदार होत त्यांच्याशी झगडाव लागलं. अशा स्थितीत रयत शिक्षण संस्थेने त्यांना पाठबळ देणे गरजेचे होते पण संस्थेने ते दिले नाही. रयतने उलटी भूमिका घेत इमानदारीने काम करणा-या आणि आपल्या विचारावर अभंग निष्ठा ठेवणा-या मृणालिनी आहेर यांच्यावर कारवाई करत त्यांची बदली केली. पहिल्यांदा ती विट्याला केली, नंतर ती रद्द करत लोणंद येथे केली. एकूणच या प्रकरणात मस्तावलेली टोळकी जे वागली ते अभिप्रेतच आहे. ही धर्मांध टोळकी अशीच वागणार आहेत. राज्यातील व केंद्रातील सत्तेने या धर्मांध झुंडींना माज आला आहे. ते या पेक्षा वेगळं वागूच शकत नाहीत. त्याचप्रमाणे सहाय्यक पोलिस निरिक्षक असेलला गर्जे नावाचा पोलिसी भामटाही तसाच वागणार. त्याला अक्कल असती तर त्याने कायदा फाट्यावर मारत आहेर यांच्यावर कारवाई करण्याची किंवा "तुमचं काय वाईट झालं तर आम्ही जबाबदार नाही !" अशी भाषा वापरली नसती. हे दोन घटक जे वागले ते अभिप्रेत आहे पण रयत शिक्षण संस्थेने जे केले ते धक्कादायक आहे. या सगळ्या प्रकाराविरूध्द मृणालिनी आहेर नावाची रणरागिणी वर्षभर एकाकी लढली. उच्च न्यायालयात जाऊन त्यांनी या सगळ्या बदमाशीला सडेतोड उत्तर दिले. सन्माननीय न्यायालयाने पोलिस खात्याचे कान उपटत आणि गर्जेच्या बुडावर कायद्याची लाथ घालत मृणालिनी आहेर यांना न्याय दिला.


मृणालिनी आहेर लढाऊ होत्या म्हणून त्या लढल्या. त्या उच्च न्यायालयात गेल्या. या ठिकाणी हलक्या काळजाचं कुणी असतं तर?

पण या सगळ्या घडामोडी घडत असताना **(पान 2 वर..)**

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा आणि फिजिओथेरपी सेंटर
कितीही जुने पॅरालिसिस असो, आयुर्वेदिक उपचार पद्धतीने १५ ते २० दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते.
हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे, बेडवर आहात? काळजी करू नका.. खात्रीशीर उपचार १००% गॅरंटी आयुर्वेदिक तज्ञांच्या निगराणीमध्ये
नातं आपुलकीचं, विश्वासाचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीच अन् आधाराचं..
समाजातील प्रत्येक घटकाशी आपूलकीचे व माणूसकीचं नात जपणारी संस्था
खंडोबा माळ रोड, लोहगाव, पुणे
संपर्क: 9503310568

After 10th & 12th
Hotel Management
BOOK YOUR SEAT NOW
Limited Seats...Hurry
Diploma - Govt Approved Two Year Course
Degree - UGC Approved Three Year Course
ADMISSION STARTED 2024-25
Be All rounder
Be Executive Chef,
Be General Manager,
Be Executive Engineer,
Be Account Manager
Be Best Bar Tender
Be F & B Manager
with Only One Course
100% JOB Guaranty
Earn & Learn
• With 2+ Years Experience
• Earn 10000+ Per Month
• Education loan @ 0 %
• Scholarship for Boys/Girls
• Foreign Languages
• 100+ Practicals
• Visits/Five Star Hotels/Wineries

INDEX ★★★★★
College of Hotel Management
Visit
Prime Point building, beside bharat petrol pump, shewalwadi phata, hadapsar, pune -411037
Web-www.iindexhospitality.com
9970667166, 9970669566

दि.पंढरपूर मर्चन्टस् को-ऑप.बँक लि. नूतन चेअरमनपदी
मा.श्री शीतलभाई तंबोळी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल अभिनंदन...

शुभेच्छुक - माढा तालुका मोटार मालक संघ व हमाल पंचायत कुर्डूवाडी

## संपादकीय

# पर्यावरण अनुकूल जीवनशैली

पर्यावरणाचा ऱ्हास आणि हवामान बदल समस्या आपल्यासमोर येऊन ठाकल्या आहेत. याला प्राथमिक दोषी मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्रियाकलापांना मानले जाते. त्याचप्रमाणे मनुष्यप्राण्यांची दैनंदिन जीवनशैलीदेखील या समस्येला अनावधानाने का होईना कारणीभूत ठरत आहे. आपले वातावरण आपल्या जीवनशैलीवर, आपल्या निर्णय प्रक्रियेवर आणि आपल्या सभोवतालच्या जगाशी संवाद साधण्याच्या पद्धतीवर सतत प्रभाव करत असते. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या आपल्याला आरामदायक वाटेल अशा गुणांसह वातावरण शोधण्याचा प्रत्येकाचा कल असतो. सांस्कृतिक पार्श्वभूमी, राजकीय विचार, आर्थिक स्थिती आणि इतर वातावरणाच्या आंतर सांस्कृतिक समज यासह जीवनातील अनेक पैलूंवर आरामाची ही पातळी प्रभावित होते. जीवनशैली सामान्यतः एखाद्या व्यक्तीची वृत्ती, जीवन पद्धतीचे मूल्ये आणि जागतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित करते.
बदलत्या पर्यावरणाविरोधात आवश्यक ती कार्यवाही न झाल्यास जागतिक स्तरावर अंदाजे 3 अब्ज लोकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 2050 पर्यंत जागतिक अर्थव्यवस्थेचा जीडीपी सुमारे 18 टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. गेल्या दोन दशकांत पर्यावरणाचा होणारा ऱ्हास आणि हवामान बदल या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक व्यापक उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. यामध्ये धोरणात्मक सुधारणा, आर्थिक प्रोत्साहन आणि नियमांचा समावेश आहे. हे सर्व उपाय प्रचंड कार्यक्षम असूनही, वैयक्तिक, सामुदायिक आणि संस्था स्तरावर आवश्यक कार्यांकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात भारत 2070 पर्यंत 'नेट झिरो' गाठेल असा उद्देश ठेवला आहे. यासाठीची 'एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्य' ही घोषणा छान आहे; पण त्यासाठी भगवान महावीरांपासून ते तथागत गौतम बुद्धांपर्यंतचा जो तत्त्वविचार आहे तो अंमलात आणणे आवश्यक आहे. तरच भारत आणि जगाला या गतेर्तून बाहेर पडता येईल.
लाइफ म्हणजे पर्यावरणासाठी जीवनशैली. प्रत्येक माणसाचे वैयक्तिक व सामूहिक कर्तव्य सुसंगत ठेवावी व त्याला हानी पोहोचू नये याची दक्षता घ्यावी. अशा जीवनशैलीचा सराव करणार्यांना लाइफ अंतर्गत प्रो प्लॅनेट पीपल म्हणून ओळखले जाते. केवळ वैयक्तिक आणि सामुदायिक वागणुकीत बदल करून देखील पर्यावरण आणि हवामानाच्या संकटांमध्ये एक महत्त्वपूर्ण फरक घडवू शकतो. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार (णछएझ) आठ अब्ज लोकसंख्येपैकी एक अब्ज लोकांनी जरी आपल्या दैनंदिन जीवनात पर्यावरणपूरक वागणूक स्वीकारली तरी जागतिक कार्बन उत्सर्जनात अंदाजे 20 टक्क्यांनी घट होऊ शकते.
आज पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी पर्यावरणाला पूरक जीवनशैली स्वीकारणे गरजेचे आहे. आपली जीवनशैली बदलणे मात्र तेवढे सोपे नाही. आपल्या सवयी आपल्या दैनंदिन जीवनात इतक्या खोलवर रुजलेल्या असतात आणि आपल्या पर्यावरणाच्या अनेक घटकांद्वारे सतत दृढ होत असतात, की पर्यावरणासाठी चांगले करण्याचा हेतू कृतीत आणणे नेहमीच सोपे नसते. तथापि, ते अशक्य पण नाही. एका वेळी एक कृती करून आणि दररोज एक बदल करून, आपण आपली जीवनशैली बदलू शकतो आणि दीर्घकालीन पर्यावरणास अनुकूल सवयी लावू शकतो.

**साध्या सोप्या गोष्टींचा सराव**

दैनंदिन जीवनात अगदी साध्या सोप्या गोष्टी अमलात आणणे सर्वांना सहज शक्य आहे. जसे, डिजिटल वापर कमी करणे, पाण्याचे संवर्धन करणे, वनस्पती आधारित आहाराचा अवलंबन करणे, प्लॅस्टिकचा वापर कमी करण्यासाठी भाजी, किराणामाल व इतर आवश्यकतांसाठी सुती किंवा तागाच्या पिशव्या बाजारात घेऊन जाणे, नैसर्गिक प्रकाशाला प्राधान्य देऊन, आवश्यकतेनुसार एलईडी लाइटिंग किंवा सीएफएल बल्बचा वापर करणे, वारंवार नवीन फर्निचर विकत घेण्याऐवजी नूतनीकरण, पुनर्निर्मिती किंवा सेकंड हॅन्ड फर्निचर खरेदी करणे, किमान पॅकेजिंग आणि नैसर्गिक घटकांना प्राधान्य देणारे टिकाऊ आणि पर्यावरणपूरक ब्रँड शोधून त्यांचा वापर करणे, काही वापरानंतर कपड्यांची विल्हेवाट लावण्याऐवजी ते गरजू व्यक्तींना देणे आणि कुटुंबीयांसोबत कपड्यांची अदलाबदल करण्याचा विचार करणे, जुन्या कपड्यांचे नवीन निर्मितीमध्ये रूपांतर करणे, कपडे घेताना अधिक टिकाऊ व शाश्वत फॅशनला प्रोत्साहन देणे, अगदी आवश्यक असल्यास हवाई प्रवास करणे अन्यथा रेल्वे किंवा बस सारख्या वाहतुकीच्या पयार्यी पद्धतीचा विचार करणे, लँड फील विसर्जनात योगदान कमी करणे इत्यादी अनेक बाबी दैनंदिन जीवनात अमलात जाणीवपूर्वक आणल्यास आपल्या ग्रहासाठी आपण एक शाश्वत भविष्य निर्माण करू शकतो.
आज भारताचे दरडोई उत्सर्जन जागतिक सरासरीपेक्षा कमी आहे परंतु 'हे विश्वची माझे घर' हे मानून, समस्त जगाला विनाशाकडे नेर्णाया हवामानातील बदल थांबवण्यासाठी रोजच्या सवयींमध्ये लहानसे बदल, मनुष्याला पर्यावरणदृष्ट्या जागृत बनवू शकते व त्याने मोठे परिवर्तन आणणे सहज शक्य आहे. समाजाभिमुखता, नियमन, नियंत्रण, स्वायत्तता व परस्परावलंबन आणि पर्यावरणीय जीवनशैली हाच समतामूलक शाश्वत उपाय आहे. गरज आहे ती इकॉलॉजिकल सिव्हिलायजेशन विकसित करण्याची. आज जो धोका आहे तोच मोकादेखील आहे, पर्यावणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याचा. पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी 'विचारहीन आणि विनाशकारी उपभोग करण्याऐवजी लक्षपूर्वक व जाणीवपूर्वक उपयोग' करणे काळाची गरज आहे.

# जखमा जुन्याच; परंतु वायनाड सारखे नवीन-नवीन घाव चिंताजनक

पुण्यातील ३० जुलै २०१४ माळीण दुर्घटनेची व रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी सारख्या अनेक दुःखद व अंगावर शहारे येणाऱ्या घटना पुवीर्ही झाल्यात.त्याचीच पुनरावृत्ती आज वायनाडमध्ये निर्माण झाली आहे.तरीही आपण अजूनपर्यंत निसर्गावर होणारे आघात आपण रोखू शकलो किंवा जातीने लक्ष देवू शकलो नाही व पाहिजे त्या प्रमाणात वृक्षलागवड करू शकलो नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.याच घटनांची पुनरावृत्ती दिनांक ३० जुलै २०२४ ला पहाटे धुव्वाधार कोसळणाऱ्या पावसाने मोठा आघात करून गाढ झोपेत असलेल्या गावकऱ्यांवर पुन्हा निसर्ग कोपुन भूस्खलनामुळे केरळमधील वायनाडवर मोठा आघात करत वायनाडमधील चार गावे ढिगाऱ्याखाली दबली व यात १६७ जणांचा मृत्यू झाला तर १२८ जण गंभीर जखमी झालेत तर आताही अनेक ढीगाऱ्याखाली असल्याचे सांगितले जाते ही अत्यंत भयावह व अंगावर शहारे येणारी घटना आहे.वायनाड मधील २२०० जनसंख्या असणारे ४ गाव ४ तासात भूस्खलनाने जमीनदोस्त झाली.केरळमध्ये २०१८ मध्ये कमी वेळात जास्त पाऊस झाल्याने भूस्खलनामुळे ४०० लोकांचा मृत्यू झाला होता. तेव्हापासुन केरळमध्ये कमी वेळात जास्त पाऊसाचे प्रमाण वाढल्याने केरळमध्ये आकस्मिक आपदाने चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.जास्त पावसामुळे भूस्खलनाचे क्षेत्र ३.४६ टक्क्यांनी वाढले आहे.देशातील २०१५ ते २०२२ पर्यंत ३७८२ भूस्खलन झाले त्यापैकी ५९ टक्के भूस्खलन एकट्या केरळमधील आहे हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे. इर्शाळवाडीची घटना अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी होती.दिनांक २० जुलै २०२३ ला कोसळत्या धुव्वाधार पावसात आणि गार वाऱ्यात ४९ कुटुंब गाढ झोपेत होते तेवढ्यात मातीचा मोठा ढिगारा डोंगरावरून घरंगळत खाली आला आणि त्याने अर्धावरून अधिक गाव गिळंकृत केले यात आतापर्यंत २९ जणांचा मृत्यू झाला होता.यापुवीर्ही अशाच भयावह घटना आपण उघड्या डोळ्यांनी पहिल्यात यावर देशातील राज्य सरकारे व केंद्र सरकार तात्पुरती उपाययोजना करून शांत बसते.परंतु पुन्हा-पुन्हा त्याच त्या दुःख घटना उद्भवतात व नवीन-नवीन जखमा करून जातात यावर केंद्र व राज्य सरकारने गांभीयार्ने विचार करण्याची गरज आहे आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे वायनाडची भूस्खलनाची ताजी घटना.देशात अजुनही असे अनेक क्षेत्र आहे की त्याठिकाणी मुलभूत सुविधांचा अभाव आहे. पावसाचे तांडव,काळीज चिरणाऱ्या दुर्घटना आणि मृतदेहाचे ढिगारे हे अलीकडे पहाले आहे. महाराष्ट्रात यापूर्वी दासगाव, सावित्री पूल, तळीये, तारिक गार्डन,ईर्शाळवाडीची भयावह घटना या जुन्या जखमा अद्याप भरून निघालेल्या नसतानाच आता निसगार्ने वायनाडवर प्रहार केला व निष्पाप लोकांचा बळी गेला. २६ जुलै २००५ ला दासगाव,जुई, कोंडीवते व रोहन या गावात दरडी कोसळून १९४ जणांचा मृत्यू झाला होता,२ऑगस्ट २०१६ला सावित्री नदीवरील पूल कोसळून ४० जणांचा बळी गेला,२५ ऑगस्ट २०२० ला महाडमधील तारिक गार्डन ही पाच मजली इमारत कोसळून १६ जण मृत्युमुखी पावले,२२ जुलै २०२१ ला पोलादपूर तालुक्यातील सुतारवाडी येथे भूस्खलन होऊन दरडीखाली ६ जणांचा मृत्यू झाला,याच दिवशी २२ जुलै २०२१ ला महाड तालुक्यातील तळीये हे गाव डोंगराखाली गडप झाले आणि ८७ लोकांचा जीव गेला आणि आता वायनाडची घटना ह्या सर्व घटना होऊन गेल्या तरीही देशातील राज्यांना जाग का येत नाही? मानवाने जंगल संपदा नष्ट केल्याने पुन्हापुन्हा अशा नैसर्गिक भयावह घटना घडत आहेत.
त्यामुळेच पुन्हा-पुन्हा जुन्या जखमा ताज्या होतांना दिसतात व वायनाड सारखा जब्बर घाव सहन करावा लागतो हे केरळचे व देशाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. देशातील किंवा राज्यातील दरड कोसळण्याच्या घटना मुख्यत्वेकरून वृक्षतोडीमुळे होत आहे ही बाब सरकार, प्रशासन, लोकप्रतिनिधी, राजकीय पुढारी, पक्ष-विपक्ष यांना माहित असुन सुद्धा देशातील अनेक राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षकटाई सपाट्याने सुरू असल्याचे आपल्याला दिसून येते.आज राज्यासह देशात मोठमोठे महामार्ग (हायवे), औद्योगिकीकरण,रस्ते रूंदीकरण,वाढत्या लोकसंख्येमुळे वस्त्यांचे वाढते प्रमाण यामुळे दऱ्याखोऱ्याना मोठे नुकसान होत आहे व धाराशाही होतांना आपण पहातो. ग्लेशिअर वितळले अशा अनेक नवीन-नवीन आपदा निर्माण होत आहे अती पावसामुळे संपूर्ण पाणी समुद्रात जाऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे ही मानवजातीसाठी व पृथ्वीतलावरील जीवजंतूसाठी धोक्याची घंटा आहे. हे सर्व प्रकार लाखो-करोडोच्या संख्येने वृक्षतोड केल्याने होत आहे. त्याचाच परिणाम आज आपल्याला नैसर्गिक आपदाच्या रूपात वायनाडमध्ये पहायला मिळत आहे.निसर्गावर होत असलेल्या अन्यायामुळे दरड कोसळणे, भूस्खलन, अतीपाऊस, अती थंडी,अती उष्णतेच्या रूपात भोगावा लागते आहे. राज्यातच नाही तर देशात अनेक नैसर्गिक आपदा येत असतात. परंतु यावर वेळीच उपाययोजना केली नाही तर पुन्हा-पुन्हा त्याची पुनरावृत्ती वायनाडच्या रूपात होतांना आपल्याला दिसते आणि यापुढेही दिसेल सुध्दा.आपण देशाचा विचार केला तर एकट्या २०२२ मध्ये ३८७ नैसर्गिक आपत्ती आल्यात त्यात ३०७०४ लोकांचा मृत्यू झाला.वायनाड सारख्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सरकारने वेळोवेळी पाऊले उचलली पाहिजेत.१९०० ते २०२२ पर्यंतची भारतातील नैसर्गिक आपत्तीची आकडेवारी पहाली तर चकीत करणारी आहे या कालावधीत ७६४ नैसर्गिक आपत्ती आल्यात यात ९१ लाख ३५ हजार ५५६ लोकांचा मृत्यू झाला याचा फटका सवार्ना सहन करावा लागला.ह्या सर्व घटना बदलत्या हवामानामुळे होत आहे. कारण भारतातीलच नाही तर जगातील ५० टक्के जंगलसंपदा वृक्ष तोडीमुळे नेस्तनाबूत झाली आहे. यामुळे सध्याच्या परिस्थितीत भारत,चीन, दक्षिण कोरिया, आणि बांगलादेश, पाकिस्तान महापुराच्या विरखळ्यात अडकलेला आहे.तर दुसरीकडे थंड हवामानाच्या युरोपमध्ये उष्णतेचा कहर सुरू आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या काही राज्यांत उष्णतेची लाट आहे तर काही राज्यांना पुराचा तडाखा बसला आहे. ब्रिटनमध्ये नेहमी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने ब्रिटन जलमग्न झाले आहे.दूबई कधीच एवढा पाऊस येत तेवढा पाऊस तीथे झाला होता.तापमानातील वाढ आणि हवामानातील बदलांचे फटके जगभरातील बहुतेक देशांना बसायला सुरुवात झाली आहे.कोरड्या प्रदेशात मुसळधार पाऊस,तर पावसाच्या प्रदेशांत दुष्काळ अशी विपरीत परिस्थिती बदलत्या हवामानामुळे जगभर निर्माण होऊ लागली आहे.यामुळे एकीकडे उष्णतेची लाट तर दुसरीकडे महापुर अशें विचित्र संकट जगावर ओढावल्याचे दिसून येते.हे सर्व संकट मानवाने स्वतःहून ओढावले आहे. त्यामुळे वायनाड सारख्या घटनांची पुन्हा-पुन्हा पुनरावृत्ती होऊ नये याकरिता सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित करून वेळोवेळी पाऊले उचलली पाहिजेत. तेव्हाच आपल्याला नैसर्गिक आपदाच्या घटनांवर थोडा का होईना अंकुश लावण्यास मदत होईल. नैसर्गिक आपदा रोखण्यासाठी वृक्षतोड ताबडतोब थांबविली पाहिजे व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून दऱ्याखोऱ्याना पुनर्जीवित केले पाहिजे हिच देशातील राज्य सरकारांकडून कडून अपेक्षा!, सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रासह देशभरात पावसाने धुमाकूळ घातला आहे त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्हे रेड अलर्टवर आहे.त्याचप्रमाणे देशातील अनेक राज्ये सुध्दा रेड अलर्टवर आहे.कुठे ढगफुटी तर कुठे सतत पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.त्यामुळे सर्वांनीच सावधगिरी बाळगावी आणि आपल्या जीवाची काळजी घ्यावी व प्रशासनाची मदत घ्यावी. कारण देशातील अनेक राज्यांचा पावसाचा धोका अजून पर्यंत टळलेला नाही. सावधान!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# लोकनेते बाबुरावजी (अण्णा) पाटील यांच्या जयंती निमित्त स्वप्निल सुतार यांचे कडून साहित्य वाटपाचा उपक्रम आदर्श घेण्यासारखा - अजिंक्यराणा पाटील

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्याचे माजी आमदार लोकनेते बाबुरावजी अण्णा अनगरकर यांच्या 107 व्या जयंती निम्मित जिजाई बहुउद्देशीय सामाजीक संस्था पिरटाकळी यांच्या वतीने जिल्हा परीषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी पिरटाकळी येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले त्याप्रसंगी अहिल्यादेवी होळकर विद्यापिठ सोलापुर चे सिनेट सदस्य युवा नेते अजिंक्यराणा पाटील बोलत होते पिरटाकळी येथील युवक नेते स्वप्नील सुतार यांनी त्यांच्या जिजाई बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून लोकनेते बाबुरावजी पाटील यांच्या 107 व्या जयंती निम्मित जिल्हा परीषद शाळा व अंगणवाडी येथील सर्व विद्यार्थी यांना वह्या पेन हे शालेय साहित्य बिस्किट व केळी वाटप तसेच पिण्याचे जार वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.
या कार्यक्रमामध्ये पिरटाकळी जिल्हा परीषद शाळेमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावलेले अनील कादे यांचा विषेश सत्कार करण्यात आला पर्यावरण संवादक व पंचायत समितीचे सेवानिवृत विस्तार अधिकारी सुदाम वसेकर यांनी पर्यावरण शपथ सर्व विद्यार्थी व उपस्थितांना दिली प्रमुख पाहूण्यांचा सन्मान संस्थेच्या वतीने स्वप्नील सुतार दादा सुतार, शंकर थिटे, प्रभाकर थिटे, वैभव थिटे याऩी केला पिरटाकळी व येथील सुतार परीवाराचे आमच्या अनगरकर पाटील परीवाराचे गेल्या तीन पिढ्याचे सबंध आहेत स्वप्नील सुतार यांनी लोकनेते अण्णांच्या जयंती निम्मित जो शैक्षणीक व सामाजीक उपक्रम राबवून एक चांगला आदर्श घालून दिला त्याचे समाजाने व युवकांनी अनुकरण करण्यासारखा आहे असे गौरव उद्गगार पाटील यांनी काढले.



यावेळी मा.जि.प.सदस्या सविताराजे भोसले, बाजार याप्रसंगी शिक्षक नेते अनिल कादे, सुदाम वसेकर,ज्ञानेश्वर सुतार, कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष सावंत, सरपंच अनिकेत पाटील ग्रमपंचायत सदस्य भिमा थिटे, सारंग थिटे,नवनाथ अवताडे, शांताबाई सुतार, अंगणवाडी सेविका मंदा सावंत शिक्षक वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते
कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिजाई बहुउद्देशीय संस्था व स्वप्नील सुतार मित्र परीवाराचे राज चवरे सनी शेख, माऊली कोळी, समाधान लवटे, सुयश मोटे यांनी परीश्रम घेतले.

# जेऊर बसस्थानकाच्या पुनर्बांधनी कामासाठी 3 कोटी ४२ लाख रुपए निधी

## आ. रणजितसिंह मोहिते पाटील व माजी आ. नारायण आबा पाटील यांचे शुभहस्ते भुमिपुजन संपन्न

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):-** आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांचे माध्यमातुन व माजी आ.नारायण आबा पाटील यांचे प्रयत्नातुन जेऊर बसस्थानकाच्या पुनर्बांधनीसाठी ३ कोटी ४२ लाख एवढा निधी उपलब्द झाला असुन या परिसरातील नागरीकांशी चर्चा करुन बसस्थानकाचे डिझाईन योग्य पद्धतीने बनवण्यासंदर्भात आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सुचना केल्या.
आ.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी या कामासाठी दि.१९/६/२०२३ रोजी



व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांना पत्र देऊन सोलापूर जिल्ह्यातील जेऊर, टेंभुर्णी व करकंब या तीन ठिकाणच्या बस स्थानकांच्या पुनर्बांधणी व आद्ययावतीकरन साठी प्रत्येकी २ कोटी रुपयांची मागणी केली होती त्यानुसार सर्व प्रशासकीय मंजुरी मिळून जेऊर व टेंभुर्णी बसस्थानकाच्या पुनर्बांधनी व नूतनीकरणसाठीनिधी उपलब्द झाला आहे.त्यानुसार जेऊर बसस्थानकाच्या पुनर्बधनीसाठी ३ कोटी ४२ लाख रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेस दि.३१/५/२०२४ रोजी मंजुरी मिळाली आहे.त्याप्रमाणे या कामाचे भूमिपूजन जेऊर बसस्थानक येथे करण्यात आले, या निधीतून जेऊर बसस्थानकास नवीन बस इमारत,कम्पाउंड वॉल, पेव्हर ब्लॉक,वीज व सांडपाणी व्यवस्था इ. कामे केली जाणार आहेत.
यावेळी मा.जि.प.सदस्या सविताराजे भोसले, बाजार समितीचे संचालक नवनाथ बापू झोळ, प.स.माजी सभापती अतुल पाटील, शेखर गाडे, शहाजीराव देशमुख, अदिनाथचे प्रशासकीय संचालक डॉ.वसंत पुंडे, दिपक देशमुख, देवानंद बागल, मा. जि.सदस्य बिभिषण आवटे, धुळाभाऊ कोकरे, राजाभाऊ कदम, विकास गलांडे, दत्ता सरडे, अजित तळेकर, प्रवाशी संघटनेचे सुहास सुर्यवंशी, डॉ. अमोल घाडगे, महेंद्र पाटील, बंडु माने, नितीन आढाव, अमरजित साळुंखे, संदिप मारकड, अमर ठोंबरे, रामेश्वर तळेकर, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील यांचेसह परिसरातील मान्यवर नेतेमंडळी उपस्थित होती.

"अकलुज माळशिरस व नातेपुते येथील बसस्थानकाच्या कामासाठी आम्ही निधी उपलब्ध केला होता परंतु आम्ही या बसस्थानकाचे बिओटी तत्वावर विस्तारीकरण करण्यासंदर्भात निर्णय घेवुन तसा प्रस्ताव दिला तो अंतिम टप्प्यात आहे.त्यामुळे अकलुज नातेपुते व माळशिरसचा निधी परत जावु नये यासाठी माढ्यातुन टेंभुर्णी, करकंब बस्थानकाचे नाव घेतल्यानंतर करमाळ्यातुन जेऊरचे नाव सुचवण्यासंदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आम्हाला विचारणा केली होती त्यानुसार आम्ही जेऊर बसस्थानकासाठी निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी केली होती. त्यानुसार जेऊर बसस्थानकासाठी निधी उपलब्द झाला आहे.
**- नारायण आबा पाटील,**
(माजी आमदार करमाळा)

पान १ वरून

# रयत शिक्षण संस्था वैचारिक...

कर्मवीर अण्णांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था जी भूमिका घेते ती ती पाहून रयत शिक्षण संस्था वैचारिक दिवाळखोरीत निघाली आहे की काय? असा प्रश्न पडतो. खरेतर 'रयत' बद्दल असे लिहीतानाही वेदना होतात. अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेकडे पाहताना छाती अभिमानाने भरून येते. आजही शेकडो रयत सेवक अण्णांचा विचार हृदयाशी कवटाळून जगतात. त्यांचा सत्यशोधकी विचार जीवापड जपतात. अण्णांच्या संस्थेतल्या प्राध्यपकाने गोविंद पानसरे सरांच्या "शिवाजी कोण होता ?" या पुस्तकाचा संदर्भ द्यायचा नाही तर मग बालाजी तांबेच्या पुस्तकाचा द्यायचा काय ? रयतचे कर्मचारी मृणालिनी आहेर यांच्या मागे का ठामपणे उभे राहिले नाहीत ? रयतने त्यांच्यावर अन्यायी कारवाई का केली ? रयतमधला कुणी म्हस्के नावाचा म्हसोबाही त्यांच्यावर माफी मागावी यासाठी कोपला होता म्हणे. मृणालिनी आहेर बंजरग दल, शिवप्रतिष्ठान व अभाविपसारख्या कट्टरवादी धर्मांध लोकांशी झुंजत असताना त्यांना पाठबळ द्यायचे सोडून रयतवाले त्यांच्यावरच कारवाई करत होते. कर्मवीर अण्णांना खरच या कर्मचा-यांची आणि पदाधिका-यांची शरम वाटली असेल. त्यांनी ज्या विचारातून रयतचा वटवृक्ष उभा केला तिथे हे घडावं ? रयतमध्ये जातीयवाद्यांची बचबच निर्माण व्हावी ? बजरंग दलाच्या विचारासोबत उभे रहात रयतवाल्यांनी त्यांच्यासमोर नांगी टाकावी ? आपल्याच सेवकावर कारवाई करावी ? हे भयंकर आहे. या प्रकरणात ज्यांनी ज्यांनी आहेर मॅडम यांच्यावर या दबाव टाकला त्यांनी त्यांनी अण्णांच्या पुतळ्यासमोर जाऊन माफी मागायला हवी. अण्णांच्या विचारांशी बांधिलकी असेल तर स्वतःच स्वतःच्या थोबाडात मारून घ्यायला हवी. वर्दीतला गर्जे नावाचा पोलिस जसा मुर्ख वागला तसेच रयतच्या कर्मचा-यांनी, पदाधिका-यांनी वागावे हे बुध्दीला पटत नाही. खरेतर आहेर यांच्या पाठीशी ताकदीने उभं राहण हे रयत संस्थेच आणि कर्मचा-यांच नैतिक कर्तव्य होतं. कर्मवीर अण्णांच्या या लेकीने अण्णांचा विचार जपत मस्तावलेल्या जातीयवाद्यांचे थोबाड फोडले. त्यांना शरण न जाता अण्णांच्या विचारांचा कणा ताठ ठेवला. ही फार मोठी गोष्ट आहे. खरेतर तमाम रयत शिक्षण संस्थेसाठी हा अभिमानाचा विषय होता. असे असतानाही रयतवाले जातीयवाद्यांच्या सुरात सुर कसे मिसळतात ? सन्माननीय न्यायालयाने या प्रकरणात मृणालिनी आहेर यांना न्याय देताना पोलिसांना जोरदार फटकारले आहे. गर्जेच्या माकडचाळ्यांना कानफटात मारली आहे. पण रयत शिक्षण संस्था आपल्याच झुंजार लेकीसोबत जे वागली आहे ते त्रासदायक आहे.
कर्मवीर अण्णा सत्यशोधक विचाराचे होते. बहूजनांची पोरं शिकावीत, ती जातीयाद्यांच्या म्हणजे भटशाहीच्या अजगरी विळख्यातून बाहेर यावीत यासाठी त्यांनी अखंड आयुष्य खर्च केले. त्याच अण्णांची रयत आज वैचारिक दिवाळखोरीत निघते आहे. तिथेही बजरग दलवाले, शिवप्रतिष्ठानवाले, अभाविपचे टोळके शिरजोर होत असेल तर परस्थिती चिंताजनक आहे. हा कर्मवीर अण्णांचाच अवमान आहे. कोटार्ने पोलिसांच्या मुस्काडीत मारल्या असतील पण या निमित्ताने रयतच्या प्रतिमेला, रयत शिक्षण संस्थेच्या विचारालाही गालबोट लागले आहे. जिथं फुलं वेचली तिथं गोव-या वेचायची वेळ का आली आहे ? याचं चिंतन रयतने करायला हवं. संस्थेत माजलेले, अण्णांच्या विचारांशी बांधिल नसलेले हे सर्व उपटसुंभ विचारांच्या चाकोरीत आणण्याची गरज आहे. या उपटसुंभांना बजरंगदल वाल्यांच्या नव्हे तर अण्णांच्या विचारांचा जो वटवृक्ष बहरला आहे त्याच्या छायेत आणणे गरजेचे आहे.

# महादेव कोगनुरे यांनी घेतली औज मंद्रूप येथील जळीतग्रस्त कुटुंबियांची भेट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज मंद्रूप येथे आज शुक्रवार दि 2 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी सिराज शेख यांच्या घरात शॉक सर्किट होऊन अचानक आग लागून संपूर्ण घर जळून बेचिराख झाले आहे.यावेळी गावातील तरुण वर्गाने आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु या तरुणांच्या प्रयत्नाला यश आले नाही.शेवटी सिराज शेख यांचे संपूर्ण घर आगीत जळून खाक झाले.या आगीत जवळपास लाख दीड लाख किंमतीचा मुद्देमाल जळून खाक झाला आहे.या अचानक लागलेल्या आगीमुळे सिराज शेख कुटुंबियांचे संसार सध्या उघड्यावर पडल्याची माहिती एम के फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर तालुक्याचे काँग्रेस नेते महादेव कोगनुरे यांना मिळताच एम के फाऊंडेशन चे पदाधिकारी व खुद्द महादेव कोगनुरे यांनी



जळीत घटनेची दखल घेत औज येथील जळीतग्रस्त सिराज शेख यांच्या घराला भेट देऊन मदतीचा हात देऊन धीर देत माणूसुकी जपली आहे. महादेव कोगनुरे हे नेहमीच जळीतग्रस्तांच्या मदतीला धावून येत असतात. याचीच प्रचिती आज पुन्हा एकदा औजकरांना व सिराज शेख कुटुंबियांना आली आहे. सतर्कता दाखवत महादेव कोगनुरे यांनी आज सिराज शेख कुटुंबियांवर दाखवलेल्या माणुसकीचे सध्या सर्वत्र कौतुक होताना पहायला मिळत आहे.
यावेळी बोलताना महादेव कोगनुरे म्हणाले की,सध्या शेख कुटुंबियांना दुःखातून सावरण्यासाठी मदतीची व धीर देण्याची नितांत गरज आहे. जळीतग्रस्त कुटुंबियांची हीच गरज ओळखून मी या ठिकाणी आलो आहे.गेली अनेक वर्षे मी जळीतग्रस्तांचे दुःख जवळून पाहिले आहे.म्हणूनच आज मी सिराज शेख कुटुंबियांना धीर देण्यासाठी याठिकाणी पोहचल्याचे सांगितले.
या वेळी पोलीस पाटील नागेश उंबरजे,सरपंच विकास केरके, तलाठी नींगु कोळे, कोतवाल भाऊसाहेब गायकवाड, निवृत्त शिक्षक कुंभार सर,इस्माईल शेख, बाबूलाल शेख, प्रथमेश गायकवाड, मल्लिकार्जुन करडे, विठ्ठल गायकवाड, आयुभ मकानदार, सुपुत्र कोरे, प्रथमेश कवडे, चंद्रकांत शेंडगे तसेच प्रतिष्ठित नागरिक व सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्वामी समर्थ महाराष्ट्र इंस्टीट्यूट ऑफ हॉटेल व्यवस्थापन संस्थेत प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाद्वारे संचलित सोलापूर येथील स्वामी समर्थ महाराष्ट्र इंस्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या संस्थेत ३ वर्षाच्या बी.एस.सी. (एचएचए) पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र उमेदवारांकडून ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत, अशी माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी कळविली आहे. बीएससी हॉस्पिटलिटी अँड हॉटेल ॲडमिनिस्ट्रेशन हा ३ वर्षे कालावधी तसेच फूड प्रॉडक्शनमध्ये पदविका, बेकरी व कन्फेक्शनरीमध्ये पदविका, फूड अँड बेवरेज सर्व्हिसमध्ये पदविका या दीड वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवारांनी मान्यताप्राप्त १०+२ प्रणालीमध्ये कोणत्याही विद्याशाखेमध्ये ४० टक्के गुण मिळवून १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वीच्या अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी हा विषय अनिवार्य असून त्यात उत्तीर्ण असावे. अंतिम पदवी प्रदान करण्याकरिता अभ्यासक्रमाला जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची मान्यता राहील. पदवी आणि पदविका अभ्यासक्रमासाठी वयोमर्यादेची अट नसून पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्त्वावर प्रवेश देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ए-१६०, कंबर तलाव जवळ, धर्मवीर संभाजी महाराज उद्यान, विजापूर रोड, सोलापूर येथे संपर्क साधावा असे आवाहनही प्राचार्यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त आस्थापनानी सहभागी व्हावे

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयानी त्यांच्या आस्थापना मधील पाच टक्के मनुष्यबळ या योजनेअंतर्गत भरण्याचे निर्देश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" शासनाने हाती घेतली असून या योजनेअंतर्गत रोजगार इच्छुक उमेदवार व रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक /आस्थापना जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून (इंटर्नशिप) मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) द्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करिता कौशल्य, रोजगार उद्योजकता नाविन्यता कार्यकारी समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी समितीची बैठक घेऊन संबंधीत सदस्यांना या योजनेची अंमलबजावणी उत्तम पध्दतीने करण्याबाबत मार्गदर्शन केले. व निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा कुंभार यांनी उच्च शिक्षण विभाग यांचेही आयोजित बैठकीत त्यांच्या अधिनस्त कॉलेजमधील उमेदवारांची जास्तीत जास्त नोंदणी या योजनेअंतर्गत करण्याबाबत मार्गदर्शन केले.

दिनांक 24 जुलै 2024 रोजी जिल्हाधिकारी यांनी सोलापूर जिल्हयातील सर्व खाजगी आस्थापना/उद्योजक, एमआयडीसी असोसिएशचे अध्यक्ष यांना या योजनेत जिल्हयातील जास्तीत जास्त उद्योजकांना सहभागी होण्याकरिता सूचित करण्यात आले. सर्वांनी याबाबत सहकार्य करण्याची व सकारात्मक भूमिका घेण्याची हमी जिल्हाधिकारी महोदयांना बैठकीत दिली. दिनांक 27 जुलै 2024 रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हयातील सर्व शासकिय/ निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्था/महामंडळे यांची व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित बैठकीत सर्व कार्यालयांना त्यांच्याही कार्यालयात सदर योजनेअंतर्गत मंजूर पदांच्या 5% मनुष्यबळ भरणेकरिता सूचित केले.

शासकीय कार्यालयांची या योजनेअंतर्गत रिक्तपदे भरण्याकरिताची कार्यवाही ही प्रगतीपथावर असून महसूल पंधरवड्यात जिल्हयातील विविध शासकीय कार्यालयांमार्फत 10 ते 15 ऑगस्ट दरम्यान युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत युवांना नियुक्त्या देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचित केले आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी यांनी संभाजीराव गरड कॉलेज मोहोळ येथे उमेदवारांना आज दिनांक 02 ऑगस्ट 2024 रोजी महसूल पंधरवडा अंतर्गत नोंदणी करण्याबाबत मार्गदर्शन केलेले असून उमेदवारांनी त्यांच्या मित्र परिवारांमध्येही नोंदणी करण्याचे आवाहन केले. त्याचबरोबर महसूल पंधरवडा योजनेअंतर्गत सर्व तालुक्यात तहसिलदार यांचेमार्फत सदर योजनेची प्रचार व प्रसिध्दी ही मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे.

दिनांक 02 ऑगस्ट 2024 रोजी महसूल पंधरवडयाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात सदर योजनेअंतर्गत अजय राजेंद्र वायदंडे व समीर अरुण काटीकर या 2 युवा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात आलेली असून या दोन्ही युवा प्रशिक्षणार्थीना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते आज नियुक्ती पत्रही देण्यात आले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली आहे.

# अक्कलकोट येथे आकांक्षित तालुका कार्यक्रम अंतर्गत येणाऱ्या 'संपुर्णता अभियाना' वर महिला मेळावा संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या नीति आयोग कडून 4 जुलै ते 30 सप्टेंबर 2024 या कालावधीसाठी देशाच्या दुर्गम भागात असलेल्या 112 आकांक्षीत जिल्हा व 500 आकांक्षीत तालुक्यामध्ये 'संपूर्णता अभियान' ही तीन महिन्यांची मोहीम सुरु करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील सांगोला व अक्कलकोट तालुक्याचा समावेश असल्याने केंद्रीय संचार ब्युरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, सोलापूर, जिल्हा आर्थिक विकास महामंडळ आणि श्री स्वामी समर्थ लोकसंचलित साधन केंद्र यांच्या सयुंक्त विद्यमाने



दिनांक 31 जुलै 2024 रोजी कांतामाती श्री विजयसिंह राजे भोसले मंगल कार्यालय, मैंदर्गी रोड, अक्कलकोट येथे संपूर्णता अभियाना वर महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर महिला कार्यकर्त्या शांभवी कल्याणशेट्टी, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, तहसीलदार विनायक मगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके, तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे, अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाकडे, श्री स्वामी समर्थ लोकसंचलित साधन केंद्राच्या अध्यक्ष सुलोचनी गवी, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, कृषी अधिकारी सचिन चव्हाण आणि क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन महिलांनी आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्षम व्हावे. भारताला महासत्ता बनण्यासाठी महिलांचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. असे मत शांभवी कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. जेष्ठ पत्रकार जोशी यांनी महिला बचत गटात येणाऱ्या अडचणी व उपाययोजना या विषयावर सविस्तर माहिती दिली. अग्रणी बँक व्यवस्थापक वाकडे यांनी महिला आर्थिक साक्षरता या विषयावर मार्गदर्शन केले.

# डाळिंब पिकाची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना शासन व प्रशासनाचे शंभर टक्के पाठबळ राहील - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## जिल्ह्यात दहा ते बारा ठिकाणी डाळिंब मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात येणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डाळिंब पीक हे सोलापूर जिल्ह्यासाठी अत्यंत योग्य पीक असून याला खूप मोठे भवितव्य आहे. शासन व प्रशासन या पिकाचे सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर लागवड व्हावी यासाठी प्रयत्न करत आहे, शासन व प्रशासन ह्या पीक लागवडीसाठी शेतकऱ्यांना शंभर टक्के पाठबळ देणार आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी डाळिंब पीक लागवडीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.





सांगोला तालुक्यातील गौडवाडी येथे कृषी विभाग व गौडवाडी डाळिंब उत्पादक शेतकरी संघ यांच्यावतीने शाश्वत निर्यातक्षम डाळिंब उत्पादन कार्यशाळा व डाळिंब प्रक्षेत्र भेट कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक राजीव मराठे, जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, डाळिंब महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे, एनआरसीपी चे शास्त्रज्ञ डॉक्टर संग्राम धुमाळ, डॉक्टर सोमनाथ पोखरे, डॉक्टर प्रशांत कुंभार यांच्यासह डाळिंब उत्पादक शेतकरी संघाचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी डाळिंब पिकाचे उत्पादन घेण्यासाठी कृषी विभाग यांच्याकडून सविस्तर माहिती घ्यावी. हे पीक खूप चांगले असून या पिकासाठी सोलापूरची जमीन व वातावरण ही पोषक आहे, हे पीक निर्यातक्षम असल्यामुळे शेतकऱ्यांना चांगले उत्पन्नही मिळणार आहे. या डाळिंब पिकाविषयी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी कृषी विभाग व आत्मा यांच्याकडून जवळपास दहा ते बारा ठिकाणी डाळिंब मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. या कार्यशाळासाठी जिल्हा नियोजन समिती मधून आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व सर्व संबंधित अधिकारी यांनी आण्णा गडदे व नाना माळी यांचे निर्यातक्षम डाळिंब प्लॉटला भेट दिली व शेतकऱ्यांशी संवाद साधला. गौडवाडी मधील डाळिंबाचे काम पाहुन समाधान व्यक्त केले व उपस्थित शेतकऱ्यांना डाळिंब पीक घेण्याबाबत मार्गदर्शन तर केलेच परंतु आपले नातेवाईक व मित्र शेतकरी बंधूंना हे पीक घेण्याबाबत आग्रह करावा असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक राजीव मराठे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने, डाळिंब महासंघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी डाळिंब पिकाचे महत्व सांगून लागवड पद्धत तसेच कोणत्या जातीचे पीक घ्यायचे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर NRCP चे शास्त्रज्ञ डा. संग्राम धुमाळ व डा. सोमनाथ पोखरे व प्रा.प्रशांत कुंभार यांनी डाळिंब पिकाविषयी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले.

या डाळिंब कार्यशाळेस प्रकल्प संचालक आत्मा शितल चव्हाण, उपसंचालक मदन मुकणे, उपविभागीय कृषि अधिकारी बाळासाहेब लांडगे, तहसिलदार संतोष कणसे, तालुका कृषि अधिकारी पंढरपुर सुर्यकांत मोरे, डाळिंब बागायतदार प्रविण माने उपस्थित होते. प्रास्ताविक शिवाजी शिंदे यांनी केले तर गौडवाडीमधील डाळिंब लागवडीविषयी माहिती उदय पंडितनाना माळी यांनी दिली.

## जाहिर प्रसिध्दीकरण

जन्म-मृत्यु नोंद अर्ज नं. 123/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. सचिन मारुती गावडे,
वय-३७ वर्षे, धंदा-शेती, — अर्जदार
रा.पाटकुल, ता. मोहोळ, जि.सोलापूर.

विरुध्द

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ,
(अर्जाची नोटीस ग्रामविकास अधिकारी, — सामनेवाला
पाटकुल ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.)

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार नामे सचिन मारुती गावडे यांचा जन्म ता.१५/०६/१९८७ रोजी मौजे पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांचा जन्म दाखल्याची ता. २४/०५/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९८७ चे अभिलेखात अर्जदार नामे सचिन मारुती गावडे यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.८/१/२०२४ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत सक्षम अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अजार्तील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.
ता.३०/७/२०२४

सही — हुकूमावरुन
लिपीक — मा. तहसिलदार सो, मोहोळ

## जाहिर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि/२२७/२०२४

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

श्री. सचिन बबन भोसले,
वय-३९ वर्षे, धंदा-शेती, — अर्जदार
रा.पाटकुल, ता. मोहोळ, जि.सोलापूर.

विरुध्द

ग्रामपंचायत पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर
(अर्जाची नोटीस ग्रामसेवक पाटकुल, — सामनेवाला
ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.)

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार नामे सचिन बबन भोसले यांचा जन्म ता.०१/०६/१९८५ रोजी मौजे पाटकुल, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांचा जन्म दाखल्याची ता.०३/०७/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९८५ चे अभिलेखात अर्जदार नामे सचिन बबन भोसले यांची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.६ /९/२०२४ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अजार्तील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.
ता.३०/७/२०२४

सही — हुकूमावरुन
लिपीक — मा. तहसिलदार सो, मोहोळ


## Classified - छोटी जाहीरात

**विक्री**

विविध डिझाईनचे फॅशनेबल स्ट्रेचेबल ब्लाउज विक्रीसाठी उपलब्ध. रेडिमेड ब्लाउज विक्रीचे प्रसिद्ध शॉप. रसगंध लेडीज वेअर, नवी पेठ, दिवेकर बेकरी समोर, सोलापूर
**मो - 9890232227**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क: 9881361260**

**पाहिजेत**

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, माकेर्टींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: **9591409911 / 9272021110**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**सद्गुरू दर्शन टूर**

12/7/2024 **काशी अयोध्या, 6 ज्योतिर्लिंग,** फक्त 9000 रु. खर्च, **अष्टविनायक दर्शन,** 24/7/2024, 3000 रु. खर्च, **रामेश्वर कन्याकुमारी** 12000 रु. खर्च, बुकींग चालू आहे.
**संपर्क : 7083214757 मायनाळे**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळावा संपन्न

## 171 उमेदवारांची प्राथमिक निवड

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त) :-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर तसेच, रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर व गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटर पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 15 उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे 171 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र.सहाय्यक आयुक्त हणमंत नलावडे यांनी दिली.



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

|| श्री अनगरसिद्ध प्रसन्न ||
**R.K कन्स्ट्रक्शन्स्**
इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...
* बांधकाम नकाशा
* स्टील डिझाईन
* इंटेरियर डिझाईन
* इस्टिमेट
* 3 D डिझाईन
* साईट सुपरव्हिजन
* कॉन्ट्रॅक्ट वर्क्स
* ब्लु प्रिंटस्
* बांधकाम परवाना
* लेबर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. **स्वप्निल पोपट कदम** M.E. (Structure) B.E. (Civil)
ऑफिस :- ग्रामीण रुग्णालयासमोर, तहसिल कार्यालयाजवळ, मेनरोड, मोहोळ
Mo. 9552547272, 8788832033 (Email:swapnil9399@gmail.com)


## कटूसत्य शब्दकोडे क्र.९३



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री २) कविता, काव्य ३) खोदलेले खंदक ४) कमजोर ५) भारतीय क्रिकेट संघाचा एक माजी कर्णधार ६) व्रण, ओळ (ग्रामीण भाषेत) ११) दुर्दशा, वाईट स्थिती, **अपेष्टा १२) उणीव, टंचाई १३) उजाड, ओसाड १५) काकाची पत्नी १७) कष्ट, परिश्रम १९) वतनाचा मालक २०) शिक्षा २२) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट **२४) महाराष्ट्राचा पूर्व-दक्षिण जिल्ह्यांचा भाग २५) दोन मिनिटात तयार होणारी, लहान मुलांच्या आवडीचा पदार्थ ज्याच्यावर सरकारने बंदी आणली होती २७) दु:ख (हिंदीत) २९) मराठी वर्षातील अकरावा महिना ३०) विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर अभिनीत राजकारणावरील चित्रपट ३१) विदेशी मद्य ३२) श्रीकृष्णाचा भाऊ ३३) बोलावणे, हाक ३७) लोकसभा सदस्य ३९) राष्ट्रवादीचे एक नेते-छगन **** ४२) संशय हिंदीत) ४३) जपानी जाड पैलवान ४५) विषमच्या विरूध्दार्थी ४७) होता जिवा म्हणून वाचला ** ४८) फटाक्याची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात

**आडवे शब्द :** १) काँग्रेस पक्षाचे एक नेते
४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ७) नवरा मुलगा, आशिर्वाद
८) सीतापती ९) एक म्हण-सुंभ जळाला तरी ** जळत नाही
१०) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा १२) भवा उलट लिहा
१४) आयपीएलमधील एक अष्टपैलू खेळाडू-*** पंड्या
१६) क्षण (हिंदीत) १७) स्वर्गातील एक अप्सरा १८) श्रीकृष्णाची आई
२०) संगत, सोबत २१) दोघांमधील अंतर, फरक २३) मुस्लिम बांधवांचा एक पवित्र सण २६) गन उलट लिहा २८) तमाशातील कलावंत
३२) सुक्या मेव्यातील एक पौष्टीक घटक ३३) बारा गुणिले पाच
३४) वास्तू, निवास ३५) थंडीमध्ये गळ्याभोवती गुंडाळतात
३६) रूग्णालय ३८) चुलत्यांना वा मावशीच्या पतीस या नावाने संबोधतात
४०) मच्छर ४१) बे दुणे ४२) लाज ४४) गुलाम
४६) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत ४८) सर्व (हिंदीत)
४९) मुस्लिम बांधवांचा एक सण
५०) गुटख्याप्रमाणे एक अंमली पदार्थ
५१) भारतातील दक्षिणेकडील एक राज्य

**शब्दकोडे क्र. ९२ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ला | ल | कृ | ष्ण | अ | ड | वा | णी | | प्र | हा | र |
| ल | ग | | | र | ब | र | | द | ण | क | ट |
| ब | ट | वा | | विं | | क | | हा | व | | र |
| हा | | न | व्व | द | | री | म | | | प | ट |
| दू | | र | | के | क | | ग | ड | क | री | |
| र | मा | | न | ज | रा | न | ज | र | | म | त |
| शा | ल | | वा | री | | व | | पो | क | ळ | |
| स्त्री | | का | ज | वा | | ल | व | क | र | | दा |
| | घा | ट | | ल | स | | धू | | क | स | म |
| ब | र | क | त | | म | नी | | ग | री | ब | |
| द | | स | र | का | र | | प | रा | त | | कि |
| क | ल | र | | न | | स | र | डा | | दि | ल्ली |

# इच्छा भगवंताची परिवार आयोजित अजित्सोव सप्ताहास उत्स्फूर्त प्रतिसाद, विविध सामाजिक, योजनांचे उपक्रम

## महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी ही योजना महत्त्वाची - किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष, तथा सोलापूर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य किसन जाधव, नगरसेवक नागेश गायकवाड, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड आणि इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा, रामवाडी यूपीसी सेंटर मध्ये 22 जुलै रोजी जन्मलेल्या नवजात शिशूंच्या नावे पाच हजार रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स करण्यात आले तसेच क्षयरोग बाधित रुग्णांना सहा महिन्यांचे अन्नधान्याचे किट देखील वाटप करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी राजस्थान राज्यातील अजमेर येथील खाजा गरीब नवाज दर्ग्यात चादर चढवून दर्गा परिसरात गोरगरिबांना अन्नदान वाटप करून त्यांच्या इच्छापूर्ती साठी बाबांकडे साकडं देखील घातलं. तसेच मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी 1 जुलै 2024 पासून सुरू झाली असून प्रभाग क्रमांक 22 येथे किसन जाधव यांच्या मार्गदर्शनाने महिलांसाठी दहा ठिकाणी मोफत नोंदणी उपक्रमात अल्पावधीतच 2000 हून अधिक महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना नोंदणी पूर्ण केली. योजनेचा प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव म्हणाले की राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली महिलांच्या आर्थिक सशक्तिकरणासाठी ही योजना महत्त्वाची पायरी ठरणार असून योजनेच्या अंतर्गत महिलांना दर महिन्याला मिळणाऱ्या 1500 रुपयांच्या निधीमुळे महिलांना कौशल्य विकासासाठी मुलांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी मोठा हातभार लागणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतील लाडकी बहीण योजनेची पहिला दोन महिन्याचा हप्ता रक्षाबंधनाच्या अगोदर आपल्या बँक खात्यामध्ये जमा होणार आहेत या योजनेचा लाभ घेण्याकरिता मोफत नोंदणी करून महिलांनी अधिक अधिक लाभ घ्यावा असे आव्हान देखील यावेळी त्यांनी केलं. तसेच अधिका अधिक महिलांना या योजनेचा लाभ व्हावा या उद्देशाने ही मोफत नोंदणी आता 31 ऑगस्ट 2024 पर्यंत राबविणार असल्याचेही यावेळी जाधव म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अजितोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रामवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉक्टर्स, नर्स, ब्रदर्स, कर्मचारी, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांच्यासह माणिक कांबळे, वसंत कांबळे, माऊली जरग, ऋषी येवले, फिरोज पठाण, कुमार जाधव, राजू जाधव, ढेरे रिक्षावाले, शिवराम गायकवाड, लल्ला कांबळे, अमोल जगताप, किरण शिंदे, अभिषेक अनवेकर, हुलगप्पा शासम, सोनू पटेल, अभिषेक पवार आदींनी परिश्रम घेतले तर या शिबिराचे शुभारंभ राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार, प्रदेश अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष, वसिम बुऱ्हाण, शहर अल्पसंख्यांकचे अमीर शेख, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, सरोजिनी जाधव, सायरा शेख, शशिकला कसपटे, रुक्मिणी जाधव, संगीता गायकवाड, शोभा गायकवाड,बिराजदार मावशी, प्रमिला स्वामी, लक्ष्मी आठवले आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

# आ. संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त तहसील कार्यालयाला संगणक, प्रिंटर व खुर्च्या भेट



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजयमामा शिंदे यांचा 31 जुलै हा वाढदिवस असतो. त्यांच्या कार्यकर्त्यांकडून या वाढदिवसाचे निमित्त साधून अनेक समाज उपयोगी उपक्रम अनेक वर्षापासून राबविले जात आहेत.

यापूर्वी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आरोग्य सेविका यांचा सन्मान करून त्यांना गणवेशाची साडी भेट देणे, वृक्षारोपण कार्यक्रम घेणे, रक्तदान शिबिर आयोजित करणे, मुलांना वह्या वाटप करणे आदी उपक्रम यापूर्वीच राबविले आहेत. यावर्षी तहसील कार्यालयामध्ये खुर्च्यांची कमतरता आहे हे लक्षात आल्यानंतर कार्यकर्त्यांकडून तहसील कार्यालयासाठी 25 खुर्च्या तसेच 2 संगणक व प्रिंटर भेट देण्यात आले. इथून पुढेही शासकीय कार्यालयांच्या ठिकाणी काही अडचणी असतील तर त्या सोडवण्याची भूमिका कार्यकर्त्यांची राहील.

गेल्यावर्षी कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून एसटी महामंडळाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण करणे, झाडांना ट्री गार्ड लावणे, परमवीर चक्र प्राप्त सैनिकांचा इतिहास फ्लेक्स च्या माध्यमातून मांडणे इत्यादी उपक्रम कार्यकर्त्यांनी घेतलेले होते. आजच्या या खुर्च्या वितरण व संगणक वितरण कार्यक्रम प्रसंगी करमाळा तालुक्याच्या तहसीलदार सौ.शिल्पा ठोकडे प्रांत अधिकारी सौ प्रियांका आंबेकर यांच्यासह संजयमामा शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळावा संपन्न

## 171 उमेदवारांची प्राथमिक निवड

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):** जिल्हा कौशल्य विकास रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर तसेच, रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर व गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटर पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 15 उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे 171 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र.सहाय्यक आयुक्त हणमंत नलावडे यांनी दिली.

या मेळाव्यास रयत शिक्षण संस्थेचे सदस्य अमरजीत पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे खिल्लारे तसेच गुरुप्रसाद स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे संचालक सजेर्राव पवार, प्रा. बी.बी नाईकनवरे, प्रा.एम. ए चंदनशिवे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे प्र. सहाय्यक आयुक्त नलावडे म्हणाले, जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करून उमेदवारांना कौशल्य आधारित प्रशिक्षण तसेच कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ जिल्ह्यातील युवक युवतींना व्हावा या दृष्टिकोनातून जिल्ह्यामधील नामांकित महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयातील युवक व युवतींना रोजगारक्षम बनवण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये 39 महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन होणार असल्याचे सांगितले.

तसेच, रोजगार मेळावा हा जिल्ह्यातील शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या प्रतीक्षेत असणारे बेरोजगार उमेदवार व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असणारे उद्योजक यांचा समन्वय साधून जिल्ह्यातील उमेदवारांना चांगल्या दर्जाचा रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने सदर रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्र.सहाय्यक आयुक्त हणमंत नलावडे यांनी सांगितले.

रयत शिक्षण संस्थेचे सदस्य अमरजीत पाटील म्हणाले, रोजगार मेळावा हा महाविद्यालय व जिल्हा कौशल्य विकास कार्यालय सोलापूर यांनी उपलब्ध करून दिलेली एक संधी आहे. असे उपस्थित उद्योजकांसमोर प्रत्यक्ष मुलाखत देऊन आणि रोजगार प्राप्त करून उपलब्ध करून दिलेल्या संधीचे चीज करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्राचार्य डॉ. खिल्लारे यांनी बेरोजगार उमेदवारांना रोजगार देण्यासाठी उपस्थित सर्व कंपन्यांचे प्रतिनिधी यांचे स्वागत केले. सदर आयोजित मेळाव्या साठी उपस्थित असणारे बेरोजगार उमेदवार हे ग्रामीण भागातील असून त्यांना मुलाखतीचा अनुभव कमी आहे परंतु त्यांच्यामध्ये असणारे काम करण्याची क्षमता ओळखून त्यांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी कशा उपलब्ध होतील यासाठी उद्योजकांनी प्रयत्न करावा.. अशी माफक अपेक्षा त्यांनी उपस्थित उद्योजकांकडून व्यक्त केली.

# आ.संजयमामा शिंदे वाढदिवसानिमित्त आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण उपक्रम राबवले



**कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठल कार्पोरेशन चे संस्थापक चेअरमन व करमाळा माढा चे आमदार संजयमामा शिंदे यांच्या 56 व्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल कार्पोरेशन मध्ये आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिर , वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केले होते. यावेळी 455 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर 2000 वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी विठ्ठल कार्पोरेशन चे कार्यकारी संचालक यशवंत शिंदे, वामन ऊबाळे, माजी आमदार विनायकराव पाटिल, सुहासकाका पाटिल, पोपट गायकवाड, हनुमंत पाडुळे, शहाजी शिंदे, लक्ष्मण लोंढे, श्रीपाद दळवी, रंगनाथ माळी, गणेश बागल, शरद भागवत, जयंत लंबटकर, कैलास भगत, संतोष ऊरमोडे, नामदेव भोसले, गणेश गुरव यांच्यासह आ.शिंदे यांचे हजारो हितचिंतक ऊपस्थित होते.

विठ्ठल कार्पोरेशन चे मुख्य कार्यकारी अधिकारी आर.एस रणवरे, एन टी साकार, आर.डी. भोसले, केन मॅनेजर सुनिल बंडगर, वित्तीय अधिकारी भास्कर गव्हाणे, डिस्लरी मॅनेजर अनिल शेळके, परचेस अधिकारी कल्याण पाटिल, प्रशासकिय अधिकारी प्रदिपकुमार पाटिल, सुहास वेदपाठक, एच आर मॅनेजर परमेश्वर माळी, सुरक्षा अधिकारी सचिन शिंदे, यासह विविध विभागातील अधिकारी व कामगार उपस्थित होते.

# पुढील चार महिन्यानंतर मीच आमदार होणार - अभिजीत पाटील

## पंढरपुरात भला मोठा हार व हजारोच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांनी गर्दी करून अभिजीत पाटलांचा केला वाढदिवस



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अत्यंत जल्लोषपूर्ण व थाटामाटात वाढदिवस साजरा केला असून यामध्ये त्यांनी दिवसभराच्या भेटीगाठी नंतर, पंढरपूर येथील आपल्या कार्यालयाच्या ठिकाणी सर्व समर्थक व कार्यकर्त्यांचा सत्कार स्वीकारला.

विधान भवनाचे छायाचित्र असलेला फलक व मोठा केक कापून अभिजीत आबा पाटील व त्यांच्या सर्व कारखान्याच्या संचालक व सर्व समर्थकांनी मिळून वाढदिवस साजरा केला यावेळी बोलताना अभिजीत पाटील म्हणाले की; विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला मोठी मदत झाल्यामुळे, सर्व आमच्या विठ्ठल परिवारातील समर्थकांना व कार्यकर्त्यांना ऊर्जितावस्था प्राप्त झाली असून, यामुळे कारखान्याच्या तर प्रश्न सुटणार आहेतच पण येत्या दोन महिन्यांमध्ये आपण आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज राहायचे असल्याचे यावेळी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की माढा मतदारसंघात त्यांच्या त्यांच्यात उमेदवारी ठरत नसून तिकडे तर विरोधकाला उमेदवारी मिळते का? नाही? असे चित्र निर्माण झाले आहे. पण माढा का पंढरपूर मंगळवेढा दोन्ही मतदारसंघाचा निर्णय हा ऐनवेळी घेतला जाणार असून आपल्या सर्व समर्थक व कार्यकर्त्यांनी दोन्ही मतदारसंघात तयारी लागावे. दोन महिन्यात आपल्याला रन खेळायचे असून त्यामुळे आत्तापासूनच त्या रणाची तयारी आपल्याला करायची आहे. इतक्या दिवस आम्हाला हिणवले गेले की पोरा पोरांची पार्टी असून यांना कोणी गांभीयार्ने घेऊ नका असे म्हणत असताना आम्ही विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जिंकली. आगामी विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार असून आपण सर्वांनी साथ द्यावी. यासाठी आपण सर्वांनी मदत करणार का? असे अभिजीत पाटील यांनी विचारलं तर उपस्थित सर्व कार्यकर्त्यांमधून मोठ्या आवाजात होकार आल्यामुळे अभिजीत आबा पाटील व त्यांच्या सर्व समर्थकांनी व कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला!

एकंदरीत माढा मतदारसंघाला जोडली गेलेली पंढरपूर तालुक्यातील ४२ गावे व त्यांचे स्वतःचे गाव असणारे देगाव हे माढा मतदारसंघात असल्यामुळे व विठ्ठल सहकारी साखर कारखाना ही माढा मतदारसंघात असल्यामुळे या मतदारसंघातही मोठी ताकद अभिजीत आबा पाटील यांच्या असून काही माढा तालुक्यातील प्रतिष्ठित नेते मंडळींनी ही अभिजीत आबा पाटील यांची भेट घेऊन आपण माढा मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी मागणी केली असल्याचे खात्रीला वृत्त असून पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघापेक्षा तुम्हाला कधीही माढा मतदारसंघ सुरक्षित असून या मतदारसंघातून आपण निश्चितच विधान भवनात जाणार आहे. सांगितले आहे त्यामुळे आगामी दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पंढरपूर मंगळवेढा किंवा माढा मतदारसंघातून असा जरी प्रश्न असला व कोणत्या पक्षातून हे जरी कार्यकर्त्यांना बुचकात टाकणारा प्रश्न असला तरी सुद्धा अभिजीत आबा पाटील यांनी विधानसभा निवडणुकीचे रणसिंग फुंकले असल्याचे या कालच्या कार्यक्रमावरून दिसत आहे.

# सक्षम ग्रामपंचायत योजने अंतर्गत वरूडा ग्रामपंचायतीत बैठक




**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):** १ ऑगस्ट २०२४ रोजी, वरुडा गावाने सक्षम ग्राम पंचायत योजने अंतर्गत एक महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले, जी पिरामल फाउंडेशनच्या गांधी फेलोजनी पुढाकार घेतली होती. या उपक्रमाचा उद्देश ग्राम पंचायतांच्या क्षमतांना बळकटी देऊन ग्रामीण समुदायांचे सक्षमीकरण करणे, शाश्वत विकासाला प्रोत्साहन देणे आणि तळागाळातील शासकीय कार्यक्षमता सुधारण्याचे आहे.ग्राम पंचायत कार्यालयात झालेल्या या बैठकीत ग्रामस्थ, पंचायत सदस्य आणि पिरामल फाउंडेशनचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच मीराबाई जी, सरपंच पती खंडेराव गडवे जी आणि ग्राम सेवक काकासाहेब आणि आशा कार्यकर्त्यांनी सत्राचे उद्घाटन केले आणि समुदायात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

पिरामल फाउंडेशनचे मुख्य सादरकर्ते प्रीती राज आणि अंकित कुमार यांनी सक्षम ग्राम पंचायत योजनेच्या उद्दिष्टांबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी मजबूत स्थानिक शासकीय प्रणालींची स्थापना, सेवा वितरण सुधारणा आणि समावेशक विकासावर भर दिला. टीमने ग्राम पंचायतांना त्यांच्या कार्यक्षमता वाढवण्यासाठी वापरता येणाऱ्या विविध धोरणे आणि साधनांची माहिती दिली, ज्यात प्रभावी नियोजन, संसाधन व्यवस्थापन आणि समुदायाचा सहभाग यांचा समावेश होता.या उपक्रमाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे तांत्रिक साधनांचा वापर करून प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे, स्थानिक शासकीय कार्यक्षमतेत पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणे. गांधी फेलोज, प्रीती राज आणि अंकित कुमार यांनी निर्णय प्रक्रिया महिला सहभागाचे महत्त्वही अधोरेखित केले, शिक्षण, मूलभूत साक्षरता आणि अंकगणित प्रोत्साहन देणाऱ्या त्यांच्या चालू असलेल्या मोहिमा आणि योजना जसे की बुनियादी शिक्षा अभियान, खुशाल बचपन अभियान, संपूर्णता अभियान, जल सुरक्षा इत्यादी. या बैठक संपल्यानंतर सरपंचांनी पिरामल फाउंडेशनचे ग्रामीण विकासासाठीच्या त्यांच्या अखंड पाठिंब्याबद्दल आभार मानले. सरपंचांनी गावाने बैठकीतून मिळालेल्या शिकवणींची अंमलबजावणी करण्याची आणि अधिक समृद्ध आणि आत्मनिर्भर वाडूळाकडे काम करण्याची वचनबद्धता पुनः पुष्टी केली. या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच व सदस्य उपस्थित होते.

# देशमुख आणि कंपनीचे काम कौतुकास्पद - आ.रोहित दादा पवार



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** देशमुख आणि कंपनी ही नेहमीच दर्जेदार कामे करणारी कंपनी आहे अशी ओळख संपूर्ण महाराष्ट्रभर निर्माण होत आहे. आज मिरजगाव-निमगाव डाकू- बिटकेवाडी या रस्त्याचे काम कंपनीने वेळेच्या आधी केल्याबद्दल खा.अमोल कोल्हे, खा.निलेश लंके व खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत आ.रोहित पवार यांच्या हस्ते कंपनीचे संचालक सुरज भैय्या देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

देशमुख आणि कंपनीने राज्यभर विस्तारित आपली रस्त्यांची काम नेहमीच गुणवत्तापूर्ण केली आहेत. आज मी मिरजगाव मध्ये आलो असलो तरी आमच्या भागातीलच म्हणजे टेंभुर्णी येथील ही कंपनी आज राज्यात आपल्या कामांने गौरवास्पद कामगिरी करत असल्याचे कौतुक वाटले असे गौरवोद्गार खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी यावेळी काढले. मिरजगाव-निमगाव डाकू-बिटकेवाडी हा 42 किमीचा रस्ता कंपनीने वेळेच्या आधीचे पूर्ण केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कंपनीचे कौतुक करीत विशेष सत्कार केला. या कार्यक्रमासाठी करमाळा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार नारायण आबा पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते...!

> आज देशमुख आणि कंपनीची राज्यभरात दर्जेदार व गुणवत्तापूर्ण कामे करणारी कंपनी अशी ओळख निर्माण झाली आहे. आज मिरजगाव-निमगाव डाकू-बिटकेवाडी या रस्त्याचे काम कंपनीने वेळेच्या आधी पूर्ण केल्याबद्दल लोकार्पण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते कंपनीचा संचालक या नात्याने माझा विशेष सन्मान करण्यात आला. याबद्दल आभार. भविष्यात ही कंपनी आपली कामे करताना तिच गुणवत्ता जपून ठेवण्यासाठी कटिबद्ध असेल.
>
> **- सुरज भैय्या देशमुख,**
> संचालक देशमुख आणि कंपनी, टेंभुर्णी

# अनुराग ठाकूर आणि सांबित पात्रा यांनी देशाची माफी मागावी - डॉ. कैलास कदम




**पुणे (कटूसत्य वृत्त) :**संसदेचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्या बाबत खा. अनुराग ठाकूर आणि सांबित पात्रा यांनी अनुद्गार काढले त्याच्या पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत. खा. ठाकूर आणि पात्रा यांनी याविषयी देशाची माफी मागावी अशी मागणी शहर काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी पिंपरी येथे केली.

डॉ. कदम यांच्या नेतृत्वाखाली पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात गुरुवारी सायंकाळी निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी ठाकूर आणि पात्रा तसेच भाजप सरकारच्या विरोधी घोषणा देऊन निषेध व्यक्त केला.

डॉ. कदम निषेध व्यक्त करताना म्हणाले की, ठाकूर यांच्या तोंडून मनुवादी आणि जातीयवादी शब्द बाहेर पडले आहेत. जाती धर्मात द्वेष निर्माण करून देशात अस्थिरता निर्माण करून छुपा अजेंडा राबविण्याचे भाजपचे धोरण आहे.

यावेळी भाऊसाहेब मुकुटमल, विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, अशोक काळभोर, मेहबूब शेख, वाहब शेख, मकरध्वज यादव, मयूर जयस्वाल, शहाबुद्दीन शेख, प्रा. किरण खाजेकर, ॲड. अशोक धायगुडे, अमर नाणेकर, अक्षय शहरकर, बाबा बनसोडे, गणेश गरड, सोमनाथ शेळके, जॉर्ज मॅथ्यू, वसंत वावरे, अर्चना राऊत, ॲड. अनिकेत राऊत, ॲड. मोहन अडसूळ, भारती घाग, सुनिता जाधव, सुवर्णा कदम, शितल सिकंदर, बबीता ससाणे, गणेश बनपट्टे, अमित मोरे, राहुल शिंपले, सतीश भोसले, गणेश शेलार, मिलिंद फडतरे, बसवराज शेट्टी आदी उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदाचा कार्यभार मनोज श्रोत्री यांच्याकडे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :** श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापक पदाचा कार्यभार पंढरपूर तहसिल कार्यालयातील निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांच्याकडे देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने नायब तहसिलदार संवगार्तील अधिकार्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मनोज श्रोत्री यांच्याकडे श्री मंदिरातील व्यवस्थापकाचा कार्यभार देण्यात आला आहे.

मनोज श्रोत्री हे 1995 ला महसूल शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. त्यांनी महसूल विभागात विविध पदावर कामकाज केलेले आहे. 2016 पासून पंढरपूर व मंगळवेढा प्रांत कार्यालय येथे नायब तहसीलदार म्हणून कामकाज पाहिले आहे. तसेच निवासी नायब तहसीलदार म्हणून तहसील कार्यालय पंढरपूर येथे कामकाज पाहिले आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांची माढा तहसिल कार्यालय येथे नायब तहसिलदार येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवार दि.1 ऑगस्ट पासून श्रोत्री यांची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत. श्रोत्री यांनी व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.